# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता चौथी











विनामूल्य वितरणासाठी

Tele MANAS
National Tele Mental Health Programme
14416

# टेली मानस हेल्पलाईन

**Tele MANAS (Tele Mental Health Assistance and Networking Across States)**

**(१४४१६ / १८००-८९-१४४१६)**

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत टेली मानस ही केंद्र पुरस्कृत योजना महाराष्ट्र राज्यात ऑक्टोबर २०२२ पासून राबवण्यात येत आहे. टेली मानस कार्यक्रमांतर्गत हेल्पलाईन क्रमांक १४४१६ द्‌वारे मोफत २४ × ७ एकात्मिक आणि सर्वसमावेशक मानसिक आरोग्य सेवा दिली जाते. यामध्ये विविध मानसिक समस्यांकरिता तज्ज्ञांमार्फत उपचार व समुपदेशन करण्यात येते. टेली मानस हेल्पलाईनवर दूरध्वनी केल्यानंतर आपण दिलेली माहिती ही पूर्णतः गोपनीय राहते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी निःसंकोचपणे आपल्या समस्या सदर हेल्पलाईन क्रमांकावर दूरध्वनीद्‌वारे (कॉल करून) सांगाव्यात तसेच मनात असणाऱ्या शंका विचाराव्यात आणि आपल्या समस्येविषयी मदत घ्यावी व दुसऱ्यांनाही मदत घेण्यास सांगावे.

# मनोदर्पण

**मनोदर्पण (८४४८४४०६३२)** ही मोफत दूरध्वनी सेवा जुलै २०२०पासून शिक्षा मंत्रालय यांच्यामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद येथील मनोदर्पण कक्षाद्‌वारे विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच शिक्षकांना मानसशास्त्रीय मार्गदर्शन व साहाय्य प्रदान करण्यासाठी सकाळी ८ ते संध्याकाळी ८ या कालावधीत आठवड्यातील सर्व दिवस उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थी, पालक व शिक्षक आवश्यक मार्गदर्शन व समुपदेशन घेण्यासाठी या हेल्पलाईनवर देखील दूरध्वनी करू शकतात.

सदर पाठ्यपुस्तक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी तयार केलेल्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रमानुसार तयार करण्यात आलेले असून त्यांचेमार्फत या पाठ्यपुस्तकाची पडताळणी करण्यात आलेली आहे. शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.०४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक ०१.०६.२०२६ रोजीच्या सभेमध्ये हे पाठ्यपुस्तक शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ पासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**समग्र शिक्षा**

# करू मैत्री मराठीशी

## इयत्ता चौथी

**(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)**



**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.**

सोबतच्या चौकटीतील Q.R. Code स्मार्टफोनद्वारे स्कॅन केल्यास आपणांस डिजिटल पाठ्यपुस्तक व पाठ्यपुस्तकातील घटकांसंबंधित दृक्, श्राव्य आणि दृक्श्राव्य स्वरूपातील अध्ययन–अध्यापन साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०२६

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

## मराठी भाषा समिती

**डॉ. संगीता बर्वे, अध्यक्ष**
डॉ. लता घोलप, सदस्य
श्रीमती राधिका पवार, सदस्य
श्रीमती अनुराधा चव्हाण, सदस्य
डॉ. चित्रा गवारे, सदस्य
श्री. नारायण शिंदे, सदस्य
श्री. देविदास गोसावी, सदस्य
डॉ. संतोषकुमार राठोड, सदस्य
श्रीमती ज्योती वालझाडे, सदस्य
डॉ. ज्ञानेश्वर नागरे, अभ्यासक्रम समन्वयक
डॉ. नंदा भोर, अभ्यासक्रम समन्वयक
श्रीमती सविता वायळ, सदस्य सचिव

## गाभा समिती सदस्य

श्री. शेषाद्री डांगे
श्री. अरूण कोल्हटकर
डॉ. आनंद काटीकर

## गुणवत्ता परीक्षण

डॉ. विद्या नावडकर, गुणवत्ता परीक्षक
श्री. संदीप कुऱ्हाडे, विधी तज्ज्ञ
प्रा. माधुरी पटवर्धन, CWSN तज्ज्ञ

## संयोजन

**श्रीमती सविता अनिल वायळ**
विशेषाधिकारी, मराठी
**श्री. अशोक बाबुराव तकटे**
सहायक विशेषाधिकारी, मराठी (वि. का.)

## निर्मिती

**श्रीमती मिताली शितप**
प्र. मुख्य निर्मिती अधिकारी
**श्री. संदीप आजगांवकर**
निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**
**श्री. हेमंत बाबर**
प्र. नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

चित्रकार : मयुरा डफळ
मुखपृष्ठ : मयुरा डफळ
अक्षरजुळणी : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.
कागद : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह
मुद्रणादेश : N/PB/2026-27/Qty. - 50000
मुद्रक : M/s. K. P. Offset, Nagpur

## भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता** प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.
(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.
(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.
(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.
(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.
(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

## राज्यगीत

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरी दरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीवघेणी
दारिद्र्याच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

# प्रस्तावना

बाल मित्रमैत्रिणींनो,

तुम्ही या वर्षी इयत्ता चौथीत आला आहात. तुमचे मनापासून स्वागत. 'करू मैत्री मराठीशी' इयत्ता चौथीचे हे मराठी भाषेचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होत आहे.

इयत्ता तिसरीमध्ये तुम्ही अक्षरगटांच्या माध्यमातून मराठी वर्णमाला शिकला आहात. मराठी वर्णमालेतील अक्षरे व स्वरचिन्हे यांचा वापर करून तुम्ही शब्द तयार करू लागला आहात. तसेच वाचनपाठाच्या माध्यमातून तुम्ही मराठी लिहायला व वाचायलाही लागला आहात.

इयत्ता चौथीच्या या पाठ्यपुस्तकातून तुम्हांला चित्रवर्णने, कविता, गोष्टी, चित्रकथा, भाषिक कोडी, भाषिक खेळ व कृती यांसारख्या विविध गोष्टी नव्याने शिकायला मिळणार आहेत. पाठ्यपुस्तकामध्ये आशयानुरूप आकर्षक व बोलकी चित्रे देण्यात आलेली आहेत. पाठ्यपुस्तकातील चित्रे पाहताना तुम्ही त्यातील प्रसंगांमध्ये एकरूप होऊन त्यावर भरपूर गप्पा माराल व चर्चा कराल. या चित्रांच्या माध्यमातून तुमचे मराठी भाषेचे शिक्षण अधिक आनंददायी व रंजक होणार आहे. पाठ्यपुस्तकातील सर्व कविता तुम्हांला साभिनय व तालासुरात म्हणता येणार आहेत. या कविता म्हणताना तुम्हांला खूप मजा येईल.

पाठ्यपुस्तकातील सचित्र असलेल्या वाचन कृती, चित्रकथा, विविध गोष्टी तुम्हांला वाचायच्या असून त्या समजून घ्यायच्या आहेत. गोष्टी ऐकताना, समजून घेताना व सांगताना तुम्ही नक्कीच त्यात रमून जाल. पाठ्यपुस्तकातील विविध विषयांशी संबंधित पाठ हे तुमच्या ज्ञानात अधिकाधिक भर घालणारे आहेत. तसेच आनंद देणारेही आहेत. उदा., 'समुद्राची मौज', 'रेघ लहान झाली', 'माझा रंग', 'केवढा मोठा मुळा', 'आभाळ पडले', 'स्वावलंबन', 'संत एकनाथ', 'छुमछुम', 'मदतीचा हात', 'चतुर शेतकरी' इत्यादी. पाठ्यपुस्तकातील सर्वच पाठ, कविता, शब्दसंपत्तीवर आधारित विविध खेळ, चित्रवर्णने, चित्रकथा या तुम्हांला नक्कीच आवडतील अशी आशा आहे.

बाल मित्रमैत्रिणींनो, तुम्हा सर्वांना मनापासून खूप खूप शुभेच्छा!

पुणे

**दिनांक :** १ मे २०२६

**भारतीय सौर :** वैशाख ११, शके १९४८
महाराष्ट्र दिन

**(अनुराधा ओक)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

## इयत्ता चौथी
## हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता

| क्रमांक | अध्ययन निष्पत्ती | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१.१ | मराठी भाषेतील संवादात सहभाग घेतो.<br>(अ) शालेय परिसरात विविध प्रसंगी मराठी भाषेत संवाद साधतो.<br>(ब) विविध प्रसारमाध्यमांवरील मराठी भाषेतील ऐकलेल्या संवादावर चर्चा करतो. | २, ३, २३, २४, ४०, ५३, ५६ |
| १.२.१ | मराठी भाषेतील कथा, कविता, संवाद यांमधील शब्दांचे अर्थ समजून घेतो.<br>(अ) मराठी भाषेतील कथा, कविता लक्षपूर्वक ऐकतो व समजून घेतो.<br>(ब) मराठी भाषेतील कथा, कविता यांमधील अपरिचित शब्दांचे अर्थ समजून घेतो. | १, ८, ९, १२, १९, २०, २५, ३१, ३२, ३६, ३८, ४१, ४४, ४५, ४६, ५४, ५६, ५८, ५९, ६२ |
| १.२.२ | ऐकलेल्या, वाचलेल्या कथा, कविता, संवाद यांविषयी आकलन झालेल्या आशयाचे सादरीकरण करतो.<br>(अ) ऐकलेल्या कवितांचे तालासुरात सादरीकरण करतो.<br>(ब) ऐकलेल्या कथा व संवाद यांचे साभिनय सादरीकरण करतो. | १, ८, ९, १२, १४, १९, २०, २५, ३१, ३२, ३३, ३६, ३७, ३८, ४४, ४५, ४६, ५४, ५६, ५७, ५८, ५९, ६२ |
| १.३.१ | परिसरातील घटना, प्रसंग याबाबत गटात चर्चा करून घटनांचा क्रम लावतो.<br>(अ) परिसरातील विविध घटना व प्रसंग याविषयी गटात चर्चा करतो.<br>(ब) चर्चेतील घटनांची क्रमाने मांडणी करून सांगतो. | ८, ९, १४, १९, २७, २८, २९, ३१, ३२, ४८, ४९, ५२, ५६, ५७, ५८, ५९ |
| २.१.१ | वाक्यातील शब्दांचे योग्य ध्वनिसह वाचन करतो.<br>(अ) स्वरचिन्हयुक्त शब्दांचे वाचन व लेखन करतो.<br>(ब) जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन व लेखन करतो. | ७, १३, १५, १८, २२, ३४, ३५, ४२, ५०, ५५, ६४ |
| २.१.२ | अर्थपूर्ण शब्द व छोटी वाक्ये वाचतो.<br>(अ) परिचित शब्दांचे वाचन करतो.<br>(ब) चार ते पाच शब्दांची छोटी वाक्ये समजून वाचतो. | १५, ३४, ३५, ४२, ५१, ६०, ६४ |
| २.१.३ | विविध प्रकारांच्या मजकुराचे वाचन करतो.<br>(अ) परिचित मराठी शब्दांचा छोटा परिच्छेद वाचतो.<br>(ब) मराठी भाषेतील छोट्या गोष्टी, कविता, बडबडगीते यांचे वाचन करतो. | २१, ३६, ४१, ४२, ४६ |
| २.२.१ | विरामचिन्हे (पूर्णविराम, प्रश्नचिन्हे) विचारात घेऊन वाक्यांचे वाचन करतो.<br>(अ) विरामचिन्हे (पूर्णविराम, प्रश्नचिन्ह) ओळखतो.<br>(ब) विरामचिन्हाचे स्थान व भाव लक्षात घेऊन वाचन करतो. | १७, ३०, ५०, ५७ |
| २.२.२ | जोडाक्षरविरहित वाक्यांचे वाचन करतो.<br>(अ) जोडाक्षरेविरहित दोन ते तीन शब्द असलेल्या छोट्या सोप्या वाक्यांचे वाचन करतो.<br>(ब) जोडाक्षरेविरहित तीन ते चार शब्द असलेल्या वाक्यांचे वाचन करतो. | ३३, ५७, ६०, ६१, ६३, ६४ |
| २.३.१ | वर्णमालेतील अक्षरे आणि स्वरचिन्हे वापरून स्वत: शब्द लिहितो व त्यावरून वाक्य सांगतो.<br>(अ) स्वरचिन्हयुक्त शब्द स्वत: लिहितो.<br>(ब) परिचित शब्दांपासून वाक्य तयार करून सांगतो. | ७, १३, १५, २६, ३३, ३६, ३७, ३९, ४३, ५१, ६० |
| २.३.२ | जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन करतो व लिहितो.<br>(अ) जोडाक्षरयुक्त शब्दांचे वाचन करतो.<br>(ब) जोडाक्षरयुक्त शब्द पाहून व ऐकून त्याचे लेखन करतो. | ११, १६, १८, २२, २७, २८, २९, ४३, ४७, ४८, ४९ |
| ३.३.१ | परिसरात बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेतून स्वत:ची शब्दसंपदा विकसित करतो.<br>(अ) परिसरात बोललेले मराठी भाषेतील नवीन शब्द अर्थासह समजून घेतो.<br>(ब) मराठी भाषेतील गोष्टी, संवाद यांच्या आधारे नवीन शब्द अर्थासह सांगतो. | १, २, ३, ४, १०, १२, १४, १९, २०, २१, २३, २४, २७, २८, २९, ३१, ३२, ३३, ३५, ३६, ३८, ३९, ४०, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ४८, ५१, ५२, ५३, ५४, ५६, ५७, ५८, ५९, ६१, ६२, ६३ |
| ३.३.२ | विविध स्रोतांद्वारे ऐकलेल्या शब्दांचे अर्थ समजून घेऊन त्याचा दैनंदिन संवादात वापर करतो.<br>(अ) विविध स्रोतांद्वारे अपरिचित शब्दांचा अर्थ समजून घेतो.<br>(ब) अपरिचित शब्दांचा अर्थ समजून घेऊन दैनंदिन संवादात उपयोग करतो. | १, २, ३, ४, १०, १५, १९, २०, २१, २३, २४, २६, २७, २८, २९, ३१, ३२, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०, ४१, ४३, ४४, ४५, ४६, ४८, ४९, ५२, ५३, ५४, ६०, ६१, ६२ |
| ३.३.३ | परिसरातील घटना, प्रसंग व अनुभवावर आधारित लेखन करतो.<br>(अ) स्वरचिन्हयुक्त शब्दांचे अनुलेखन व श्रुतलेखन करतो.<br>(ब) परिसरात ऐकलेल्या घटना, प्रसंग यांचे दोन ते तीन वाक्यांत लेखन करतो. | ३४, ५५, ५८, ५९, ६०, ६४ |

- **अध्यापनाद्‌वारे विद्यार्थ्यांकडून वर दिल्याप्रमाणे किमान अध्ययन निष्पत्ती साध्य करून घेणे अनिवार्य आहे. अध्ययन निष्पत्तींच्या समोर दिलेल्या पृष्ठक्रमांकाच्या व्यतिरिक्त इतर पृष्ठक्रमांकांवर दिलेल्या आशयाद्‌वारे देखील इतर अध्ययन निष्पत्ती साध्य होऊ शकतात, असा प्रयत्न शिक्षकांनी करावा.**

# शिक्षक व पालकांसाठी सूचना

हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु, तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता नव्याने तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम डोळ्यांसमोर ठेवून 'करू मैत्री मराठीशी' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आलेले आहे. अभ्यासक्रमातील इयत्ता चौथीच्या अध्ययन निष्पत्तींचा विचार करून इयत्ता चौथी या पाठ्यपुस्तकाची रचना करण्यात आली आहे. इयत्ता चौथीच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा परिचय इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीमध्ये झालेला आहे. मराठीतील अक्षरे, स्वरचिन्हे यांपासून तयार झालेले अक्षरगट व वाचनपाठ, वाक्ये, लहान मजकुराचे पाठ विद्यार्थ्यांनी इयत्ता तिसरीपर्यंत अभ्यासलेले आहेत.

इयत्ता चौथीमध्ये विद्यार्थ्यांच्या वर्णमालेचे दृढीकरण होण्यासाठी विविध कृती देण्यात आल्या आहेत. यातून विद्यार्थ्यांची वर्णमालेची उजळणी व सराव होणार आहे. या पाठ्यपुस्तकामध्ये कविता, गाणी, गोष्टी, चित्रकथा, चित्रवर्णन, शब्दसंपत्तीवर आधारित कृती यांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापनामध्ये विद्यार्थ्यांच्या माध्यमभाषेचा व मातृभाषेचा विचार करणे अपेक्षित आहे. तसेच विद्यार्थ्यांना त्यांचे अनुभव मराठी भाषेतून व्यक्त करण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. मराठी भाषेतील श्रवण, भाषण-संभाषण, वाचन व लेखन या भाषिक कौशल्यांचा अधिकाधिक विकास होण्याच्या दृष्टीने शिक्षकांनी पाठ्यपुस्तकांमध्ये दिलेल्या सूचनांचा उपयोग करणे आवश्यक आहे. पाठ्यपुस्तकामधील पाठ्यघटक व कृती आनंददायी व क्रीडायुक्त स्वरूपात देण्यात आलेल्या आहेत. त्यांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत.

पाठ्यपुस्तकातील आकर्षक व बोलकी चित्रे, वर्णमालेचा सराव, चित्रकथा, गोष्टी, कविता, शब्दसंपत्तीवर आधारित विविध खेळ व कृती, शब्दकोडी यांसारख्या घटकांची अध्यापन करताना अधिकाधिक उदाहरणे देणे, प्रश्न विचारणे, शैक्षणिक साहित्याचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या शब्द वाचनाचा व लेखनाचा अधिकाधिक सराव घेणे, विद्यार्थ्यांना भाषण-संभाषणासाठी संधी उपलब्ध करून देणे यांसारख्या गोष्टींवर भर देण्यात यावा. पाठ्यपुस्तकातील पाठ्यघटकांचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना गटांमध्ये चर्चा करण्याची व मते मांडण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

## चित्रवर्णन

- विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
- चित्रांतील विविध वस्तू, व्यक्ती व प्रसंग यांबाबत विविध प्रश्न विचारून बोलते करावे.
- विद्यार्थ्यांच्या तार्किक शक्तीचा विकास होण्यासाठी चित्रांतील विविध घटकांवर आधारित उपयोजनात्मक प्रश्न विचारावेत, अभिव्यक्त होण्याच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.
- दैनंदिन जीवनातील प्रत्यक्षातील अनुभवांची सांगड चित्रांशी घालून विद्यार्थ्यांमध्ये समस्या निराकरणाची दृष्टी निर्माण करावी.

## कविता

- विद्यार्थ्यांना कविता ऐकवाव्यात. वैयक्तिक व सामूहिकरीत्या सादर करण्यासाठी प्रोत्साहित करावे.
- कविता म्हणताना सर्व विद्यार्थी शब्दांचे योग्य व स्पष्ट उच्चारण करतात का ? याकडे जाणीवपूर्वक विशेष लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांना शब्द स्पष्ट उच्चारण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. तसेच शब्द उच्चारणाचा सराव करून घ्यावा.
- विद्यार्थ्यांना वर्गामध्ये कविता तालासुरात व साभिनय सादर करण्यासाठी संधी उपलब्ध करून द्याव्यात.

## पाठ, चित्रकथा

- पाठ्यपुस्तकातील पाठ व चित्रकथा विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगाव्यात. वाचलेला मजकूर त्यांच्या शब्दांत मांडण्यास प्रोत्साहित करावे.
- वाचन, भाषण-संभाषण या कौशल्यांच्या विकासासाठी पाठांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.
- पाठ व चित्रकथा यांमधील चित्रांचे निरीक्षण करून चित्रांद्‌वारे व्यक्त होणाऱ्या प्रसंगांचे वर्णन करण्यास प्रेरित करावे.

## शब्दखेळ

- शब्दसंपत्तीवर आधारित विविध कृती व खेळ विद्यार्थ्यांकडून कृतियुक्त स्वरूपात करून घ्यावेत. तसेच त्यांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा.

## अभिव्यक्ती

- अभिव्यक्तीसाठी विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा उपयोग केल्यास त्याचा स्वीकार करावा. मातृभाषेचा स्वीकार करत असताना विद्यार्थ्यांना मराठी प्रमाण भाषेकडे नेण्याच्या जास्तीतजास्त संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# अनुक्रमणिका


## भाग – १

१. परी राणीचे विमान (कविता) १
– सुवर्णलता विधाते

● शाळा प्रवेशोत्सव (चित्रवर्णन) २

२. समुद्राची मौज (चित्रकथा) ८

३. घड्याळ (कविता) १२

४. रेघ लहान झाली. १४

५. माझा रंग १९

## भाग – २

● शाळेतील भाजीमंडई (चित्रवर्णन) २३

६. आनंदाने नाचू या! (कविता) २५
– के. नारखेडे

७. केवढा मोठा मुळा २७

८. आभाळ पडले. (चित्रकथा) ३१

९. संगीत सभा (कविता) ३६
– विष्णू रा. गिरी

१०. स्वावलंबन ३८

## भाग – ३

● वनभोजन (चित्रवर्णन) ४०

११. उंच उंच आकाश (कविता) ४१
– संजीवनी देवधर

१२. संत एकनाथ ४४

१३. भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण ४५

१४. नदीताई (कविता) ४६
– मिलिंदकुमार जोशी

१५. छुमछुम ४८

## भाग – ४

● स्नेहसंमेलन (चित्रवर्णन) ५३

१६. फुलपाखरू (कविता) ५४
– दादासाहेब कोते

१७. मदतीचा हात ५६

१८. चतुर शेतकरी ५८

१९. आगगाडी (कविता) ६२
– शंकर विटणकर


**सूचना :** विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत अध्ययन-अध्यापन प्रक्रिया करताना सांकेतिक खुणांच्या भाषेचा (साईन लँग्वेज) तसेच अन्य पूरक अध्यापन पद्धतींचा वापर करावा. विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्या पद्धतीने शक्य असेल, त्या पद्धतीने व्यक्त होण्याची संधी द्यावी.

# १. परी राणीचे विमान





**ऐकू या. म्हणू या. गाऊ या.**

विमान आलं विमान आलं
परी राणीचं विमान आलं
रंग त्याचा किती छान
पंखांची आहे नक्षीदार कमान
पिवळ्या रंगावर तांबडी बुट्टी
विमानाची जमली फुलांशी गट्टी
परी राणीचे विमान नका बरे धरू
हे तर आपले आवडते
फुलपाखरू

**– सुवर्णलता विधाते**

**नवीन शब्द शिकू या : कमान** – प्रवेशद्‌वारावरील गोल रचना. **गट्टी** – दोस्ती.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव करून घ्यावा. फुलपाखराबाबत विविध प्रश्न विचारावेत. उदा., (१) तुम्ही फुलपाखरे कोठेकोठे पाहिली आहेत? (२) फुलपाखरे कशी दिसतात? विद्यार्थ्यांची स्वभाषा स्वीकारावी. स्वभाषा स्वीकारत असताना त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. कवितेत आलेल्या अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. कविता म्हणण्याचा सराव करून घ्यावा.

# ● शाळा प्रवेशोत्सव

- चित्र पाहा. निरीक्षण करा व सांगा.












**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्रांचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रांमधील वस्तू, व्यक्ती यांची ओळख करून द्यावी. ते एकमेकांशी काय बोलत असतील यावर चर्चा करावी. चित्राविषयी बोलताना विद्यार्थ्यांच्या मातृभाषेचा स्वीकार करावा. स्वभाषा स्वीकारत असताना त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून चित्राविषयी बोलण्यास प्रेरित करावे.

- **रस्ता शोधा.**



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रात आलेल्या विविध घटकांची नावे विचारावीत. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असणारे मराठी शब्द सांगावेत. विद्यार्थ्यांकडून सांगितलेले शब्द म्हणून घ्यावेत. चित्रशब्द ओळखण्याचा सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांकडून चित्रातील कोडे सोडवून घ्यावे.

- **गिरवा. वाचा व सराव करा.**




- **गिरवा. वाचा व सराव करा.**

क ख ग घ ङ च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण त थ द ध न

प फ ब भ म य र ल व श

ष स ह ळ क्ष ज्ञ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वर्णमालेतील अक्षरे योग्य पद्धतीने गिरवण्याचा सराव करून घ्यावा. वर्णमालेच्या अधिक सरावासाठी उपलब्ध साहित्याचा उपयोग करावा. उदा., वही, पेन्सील, खडू इत्यादी.

- **खालील रिकाम्या जागी योग्य अक्षरे लिहून वर्णमाला पूर्ण करा व सराव करा.**

## स्वर

अ ___ इ ___ ___ ऊ ऋ ___ ए ___

ऐ ___ ऑ ___ ___ अः

## व्यंजने

क ___ ग ___ ङ ___ छ ___ झ ___

___ ठ ___ ढ ___ त ___ ___ ध ___

प ___ ब ___ म य ___ ल ___ ___

ष ___ ह ___ ___ ज्ञ

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून वरील माळेमधील रिकाम्या जागी वर्णमालेतील अक्षरे लिहून घ्यावीत. वर्णमालेच्या लेखन-वाचनाचा सराव करून घ्यावा.

• पाहा. योग्य स्वरचिन्हे जोडून शब्द तयार करा, लिहा, वाचा व सराव करा.







**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना अक्षरे व स्वरचिन्हे जोडून शब्द कसे तयार होतात हे तंत्रज्ञानाच्या साहाय्याने समजावून सांगावे. वेगवेगळी अक्षरे व स्वरचिन्हे वापरून विविध शब्द तयार करून घ्यावेत. वरील अक्षरांवर व स्वरचिन्हांवर आधारित विविध भाषिक खेळ घ्यावेत.

# २. समुद्राची मौज

- ऐका. म्हणा व सराव करा.



आज समुद्र फार मजेशीर वाटत आहे. चला, जरा दूरवर फिरून येऊ.



वाचवा! वाचवा!
अरे, कोणीतरी मला वाचवा!



अरे, घाबरू नकोस. चल, माझ्या पाठीवर बस. मी तुला समुद्राची मजा दाखवतो.



तुझ्या पाठीवर बसून फिरताना मला खूप मजा वाटतेय.



अरे! किती रंगीबेरंगी मासे आहेत.



तुमचे जग कमालीचे सुंदर वाटते.



हा बघितलास का वॉलरस!



हा पाहा तारामासा! आकाशातील ताऱ्यांसारखाच वाटतोय ना?



समुद्रात पण मगर आणि कासव असतात!



ती बघ तुझी होडी!



येतो हं मासेदादा!



पुन्हा भेटू या!

**नवीन शब्द शिकू या : मौज** – मजा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध कथा ऐकवाव्यात. कथेतील पात्रांविषयी व घटनांविषयी चर्चा करावी. अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. संवादातील पात्रे व घटनाक्रम लक्षात घेऊन कथेचे सादरीकरण करून घ्यावे.

- **चित्र पाहा. ऐका. म्हणा. वाचा व लिहा.**



झाडू



फळा



चेंडू



कप



पुस्तक



बशी



वही



माठ



चमचा



खडू



बादली



बाक

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांची मराठी भाषेतील शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी घर, परिसर, शाळा, वर्ग या ठिकाणी असणाऱ्या वस्तूंची नावे सांगावीत व म्हणून घ्यावीत. चित्रशब्दकार्डे तयार करून वाचनाचा व लेखनाचा सराव करून घ्यावा.

- **जोडाक्षरे वाचा व समजून घ्या.**

स् त
स् त
**स्त**
मस्त

म् ह
म् ह
**म्ह**
म्हण

त् या
त् या
**त्या**
आत्या

- **बाहेरील अक्षर, गोलातील अक्षराला जोडून तयार झालेला शब्द वाचा, लिहा व सराव करा.**

फ → **स्त**
सु → **स्त** ← जा
म → **स्त**

जास्त
................
................
................
................
................
................
................

ग → **प्पा**
क → **प्पा** ← ट
आ → **प्पा**

................
................
................
................
................
................
................
................

- **वाचा व समजून घ्या.**

च् या
च् या
**च्या**
तुमच्या

ड् या
ड् या
**ड्या**
साड्या

ट् या
ट् या
**ट्या**
गोट्या

- **ऐका. म्हणा. वाचा. लिहा व सराव करा.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तिच्या | – ................ ................ | काड्या | – ................ ................ | वाट्या | – ................ ................ |
| त्याच्या | – ................ ................ | होड्या | – ................ ................ | छोट्या | – ................ ................ |
| रस्ता | – ................ ................ | खोड्या | – ................ ................ | पाट्या | – ................ ................ |
| पुस्तक | – ................ ................ | तुम्ही | – ................ ................ | म्हणून | – ................ ................ |

# ३. घड्याळ

ऐकू या. म्हणू या. गाऊ या.



घड्याळा घड्याळा थांब थांब
कोठे धावतोस सांग सांग
दोन तुला काटे,
लहान आणि मोठे

भिंतीवर, टेबलावर,
ताईच्या हातावर
ऐटीत बसायचे,
किती वाजले सांगायचे

तुला नाही विश्रांती,
तुला नाही विसावा
सारखे आपले काम काम
कुठे धावतोस सांग सांग






**नवीन शब्द शिकू या : काटे** – सेकंद, मिनिटे, तास दाखवणाऱ्या धातूच्या फिरत्या काड्या. **विश्रांती** –आराम.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. कविता साभिनय म्हणण्याचा सराव करून घ्यावा.



## आम्हांला हे समजले.

**प्र. १. उत्तरे सांगा.**

(अ) कविता कशाविषयी आहे?

(आ) घड्याळात किती काटे असतात?

(इ) घड्याळ कोठेकोठे दिसते?

**प्र. १. योग्य पर्यायाला ✓ अशी खूण करा.**

(अ) घड्याळाचे काटे कसे आहेत? | लहान-मोठे | जाड-पातळ |

(आ) घड्याळ सतत काय करते? | झोपते. | काम करते. |



## विचार करा व सांगा.

- घड्याळाचे मुख्य काम काय आहे?



## लिहिते होऊ या.

- चित्राशी संबंधित शब्द लिहा.






## खेळू या शब्दांशी

- अक्षरे जुळवून शब्द तयार करा, लिहा व वाचा.

(अ) ल ब टे - ......................

(आ) ळ ड्या घ - ......................

(इ) वा सा वि - ......................

(ई) खे र सा - ......................



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) वेगवेगळ्या आकारांच्या घड्याळांची चित्रे काढा व रंगवा.
  (२) पुठ्ठ्यांपासून घड्याळाची प्रतिकृती तयार करा.

# ४. रेघ लहान झाली.

• **ऐका. म्हणा व सराव करा.**



एकदा अकबर आणि बिरबल फिरायला गेले होते. चालता चालता बादशहा अचानक थांबला. बादशहाने बोटाने वाळूत एक रेघ मारली. बादशहा म्हणाला, ''ही रेघ लहान करायची; पण पुसायची नाही.'' बिरबलाने एकदा बादशहाकडे व एकदा रेघेकडे पाहिले. थोडा विचार केला. पटकन खाली वाकला. बादशहाने काढलेल्या रेघेशेजारी दुसरी लांब रेघ मारली आणि म्हणाला, ''महाराज झाली की नाही तुमची रेघ लहान?'' बादशहा चकित होऊन बिरबलाकडे पाहतच राहिला.



महाराज



बिरबल

रेघ

**नवीन शब्द शिकू या : रेघ** – रेषा. **चकित होणे** – नवल वाटणे.

**शिक्षकांसाठी :** पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. पाठात आलेल्या चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. पाठातील प्रसंगावर चर्चा करावी. पाठातील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. पाठावर आधारित प्रश्न विचारून मराठीत उत्तरे देण्यास प्रेरित करावे. शालेय ग्रंथालयातील मराठी भाषेतील विविध गोष्टींची पुस्तके उपलब्ध करून द्यावीत. कथेचे सादरीकरण करून घ्यावे.



## आम्हांला हे समजले.

- **एका शब्दात उत्तरे लिहा.**

(अ) फिरायला कोणकोण गेले होते? ........................ ........................

(आ) बादशहाने बोटाने रेघ कोठे मारली? ........................ ........................

(इ) कोणाची रेघ लहान झाली? ........................ ........................



## विचार करा व सांगा.

- **गोष्टीतील पात्रांची नावे सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **अक्षरांचे योग्य क्रम लावून अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| जसे– ल र बि ल | बिरबल | त च कि | ........................ |
| हा द बा श | ........................ | हा न ल | ........................ |



## खेळू या शब्दांशी

- **शब्दसाखळी पूर्ण करा.**






## चला वाचू या.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| खाली | रेघ | बोट | महाराज | बिरबल |

- पाहा. ऐका. म्हणा व सराव करा.



ल् + ह = ल्ह
**कोल्हा**



ग् + न = ग्न
**अग्नी**



त् + त = त्त
**हत्ती**



ज् + य = ज्य
**ज्योत**



म् + ह = म्ह
**म्हैस**



ल् + ला = ल्ला
**किल्ला**



ट् + या = ट्या
**गोट्या**



च् + छ = च्छ
**गुच्छ**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना जोडाक्षरे कशी तयार होतात हे वरील कृतींच्या आधारे समजावून सांगावे. विद्यार्थी जोडाक्षरांचे श्रवण बारकाईने करतात का? त्याप्रमाणे शब्दांचे उच्चार योग्य प्रकारे करतात का? याकडे लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांकडून जोडाक्षरे तयार करण्याची कृती करून घ्यावी. जोडाक्षर लेखनाचा सराव करून घ्यावा. जोडाक्षरयुक्त शब्दांचे लेखन व वाचन करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे.

# • पूर्णविराम (.)

• ऐका. म्हणा. समजून घ्या व सराव करा.



हा आमची मनीमाऊ.
नेहमीच हवा तिला खाऊ.
उठता बसता गुरगुर करते.
म्याव म्याव सुरूच असते.
गुपचूप गुपचूप घरात येते.
वाटीतील दूध पिऊन जाते.



प्रत्येक चौकटीतील एक शब्द घेऊन अर्थपूर्ण वाक्य तयार करा. शेवटी पूर्णविराम द्या.



| | | | |
|---|---|---|---|
| लीला कबीर ओजस मीना मामा | पेरू भाजी आरसा पालक सरबत | दे घे बघ काप कर | . |



**जसे – मीना आरसा बघ.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना उताऱ्याचे वाचन करून दाखवावे. पूर्णविरामाची ओळख करून द्यावी. वाक्य संपल्यानंतर वाक्याच्या शेवटी पूर्णविराम दिला जातो हे समजावून सांगावे. लहानलहान वाक्ये देऊन पूर्णविराम देण्याचा सराव करून घ्यावा. सरावासाठी विविध कृती घ्याव्यात.

- वाचा. समजून घ्या व सराव करा.

| | | |
|---|---|---|
| त् + र = त्र | प् + र = प्र | ट् + र = ट्र |
| मित्र | प्रकाश | ट्रक |
| श् + र = श्र | र् + य = ऱ्य | र् + य = र्य |
| श्रावण | कैऱ्या | सूर्य |

- गोलातील अक्षरासारखे अक्षर शोधा. शोधलेल्या अक्षराला गोल ◯ करा व सराव करा.

| | | | |
|---|---|---|---|
| मित्र – | पुत्र | चित्रा | मैत्री |
| प्रकाश – | प्राण | प्रश्न | प्रदीप |
| राष्ट्र – | राष्ट्रीय | सौराष्ट्र | राष्ट्रगीत |
| श्रावण – | श्रम | श्रोता | विश्रांती |
| गाणाऱ्या – | पऱ्या | दऱ्या | साऱ्या |
| सूर्य – | कार्य | शौर्य | सहकार्य |

- वाचा, लिहा व सराव करा.

| | | | |
|---|---|---|---|
| पत्र | प्रगत | क्रमांक | दोऱ्या |
| श्रेय | तऱ्हा | खर्च | महाराष्ट्र |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना 'र'च्या विविध जोडाक्षरांची ओळख करून द्यावी. विविध कृतीतून त्यांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. त्यावर आधारित विविध भाषिक खेळ घ्यावेत.

# ५. माझा रंग

• ऐका. म्हणा व सराव करा.



टॉमी नावाचा एक कुत्रा होता. तो अगदी पांढराशुभ्र होता. एके दिवशी दुपारी टॉमी एका झाडाखाली गाढ झोपला होता. अचानक त्याच्या पाठीवर काहीतरी पडले. टॉमी दचकून जागा झाला. त्याने नदीच्या पाण्यात पाहिले आणि तो ओरडला, ''अरे बापरे! माझ्या अंगावर हे जांभळे ठिपके कुठून आले?''



टॉमीला वाटले कोणीतरी त्याची थट्टा केली आहे. तो शोधायला निघाला.

सर्वांत आधी त्याला निळे आकाश दिसले. टॉमी त्याला म्हणाला, ''हे जांभळे ठिपके तू मला दिलेस का?'' आकाश म्हणाले, ''नाही रे टॉमी, माझा रंग तर निळा आहे. मी कसा देईन तुला हा रंग?''

टॉमी एका लाल गुलाबाच्या फुलाजवळ गेला. त्याने फुलाला विचारले, ''फुला, फुला तू माझ्या पाठीवर हे रंग उडवलेस का?'' गुलाब डुलत म्हणाला, ''छे रे! मी तर लाल आहे, मी तुला जांभळे ठिपके कसे देईन?''



आता टॉमीने बागेतील फुलपाखराला विचारले, ‘‘का रे, फुलपाखरा तू माझ्या अंगावर हे जांभळे ठिपके दिलेस ना?’’ फुलपाखरू म्हणाले, ‘‘नाही रे टॉमी, मी तर रंगीबेरंगी आहे. मी तुला जांभळा रंग कसा देईन?’’





टॉमी आता उदास झाला. त्याला वाटले आता हे ठिपके कधीच जाणार नाहीत. तो पुन्हा त्याच झाडाखाली जाऊन रडू लागला. तेवढ्यात ‘टप’ असा आवाज झाला. त्याने वर पाहिले, तर ते जांभळाचे झाड होते. वारा सुटल्यामुळे, रसाळ जांभळे खाली पडत होती. टॉमी ज्या ठिकाणी झोपला होता, तिथे भरपूर जांभळे फुटली होती. त्याचाच रंग टॉमीला लागला होता. टॉमी आनंदाने जांभळाच्या झाडाकडे पाहू लागला.

**नवीन शब्द शिकू या : गाढ** – शांत. **थट्टा** – मस्करी.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठ वाचून दाखवावा. पाठातील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. विद्यार्थ्यांना पाठातील घटनाक्रम सांगण्यास प्रेरित करावे. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. ग्रंथालयातील कमी मजकूर व जास्त चित्रे असलेली गोष्टींची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत. तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करून गोष्टी ऐकवाव्यात. वाचलेल्या, ऐकलेल्या गोष्टी सांगण्यास प्रेरित करावे.



## आम्हांला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) टॉमी कोठे झोपला होता ? ........................................

(आ) टॉमीच्या अंगावर कोणत्या रंगाचे ठिपके आले ? ........................................

(इ) त्याने ठिपक्यांविषयी कोणाकोणाला विचारले ? ........................................



## विचार करा व सांगा.

- **टॉमीच्या पाठीवर जांभळे ठिपके कसे आले ते सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **रंग पाहा. रंगांची नावे लिहा.**

 .....................  .....................  .....................  .....................



## खेळू या शब्दांशी

- **चित्र पाहा. योग्य शब्द लिहा. शब्दांची वाक्ये तयार करून सांगा.**

     



## चला वाचू या.

कुत्रा हा पाळीव प्राणी आहे. कुत्रा घराची राखण करतो. कुत्रा भाकरी खातो. कुत्रा भों-भों भुंकतो. तो इमानदार प्राणी आहे.

# वाचू या, लिहू या

- चित्रे पाहा. शब्द वाचा, लिहा व सराव करा.


म्हैस
................
................


ट्रक
................
................


पुस्तक
................
................


कुत्रा
................
................


चंद्र
................
................


चश्मा
................
................


छत्री
................
................


बॅट
................
................



वर्तमानपत्र
.........................
.........................


कैऱ्या
................
................


कुऱ्हाड
................
................


बिस्किट
................
................


घड्याळ
................
................


खुर्ची
................
................


आइस्क्रीम
................
................


किल्ला
................
................

# • शाळेतील भाजीमंडई

• चित्रे पाहा, सांगा व सराव करा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. भाजीमंडईचे चित्र दाखवून विद्यार्थ्यांना बोलते करावे. चित्रातील व्यक्ती काय बोलत असतील हे विचारावे. विद्यार्थ्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. चित्राविषयी मराठीत बोलण्यास प्रेरित करावे.

# भाषिक खेळ

- खाली दिलेल्या चौकटींमध्ये काही फळे दिलेली आहेत. त्यातील फळांची चित्रे रेघेने जोडा.



- ऐका व म्हणा.

| | | | |
|---|---|---|---|
| केळी | चिकू | पेरू | आंबा |
| फणस | द्राक्षे | संत्रे | जांभूळ |
| पपई | कलिंगड | अननस | सफरचंद |

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चौकटींतील सर्व चित्रांची नावे सांगावीत. त्यातील फळांची चित्रे रेघेने जोडून घ्यावीत. शब्दसंपत्ती वाढीसाठी विविध प्रकारचे भाषिक खेळ घ्यावेत. तसेच फळांची चित्रे व त्यांची नावे अशी कार्डे तयार करून विद्यार्थ्यांकडून चित्रे व नावे ओळखण्याचा सराव घ्यावा.

# ६. आनंदाने नाचू या!

**ऐकू या. म्हणू या. गाऊ या.**

चला गड्यांनो, खेळू या ।
आनंदाने नाचू या ॥

बाग चिमुकली
फुले उमलली
सुंदर फुलली
फुलांसारखे होऊ या
फुलांभोवती नाचू या ॥

फुलांभोवती
भुंगे फिरती
गाणी गाती
तसेच आपण गाऊ या
ताल धरोनी नाचू या ॥

आभाळाचे
तऱ्हेतऱ्हेचे
रंग मजेचे
चला चला रे पाहू या
आनंदाने नाचू या ॥

**– के. नारखेडे**



**नवीन शब्द शिकू या : चिमुकली** – लहान. **धरोनी** – धरून. **तऱ्हेतऱ्हेचे** – वेगवेगळे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव करून घ्यावा. अपरिचित शब्दांचे अर्थ सांगावेत. कविता म्हणण्याचा सराव करून घ्यावा.



## आम्हांला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) कवितेतील बाग कशी आहे? ..............................................................................

..............................................................................

(आ) फुलांभोवती कोण फिरत आहे? ..............................................................................

..............................................................................



## विचार करा व सांगा.

- **बागेत कोणकोणत्या गोष्टी असतात ते सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(नाचू या, आपण, फुलांसारखे)

(अ) .............. होऊ या.

(आ) ताल धरोनी ..............

(इ) तसेच .............. गाऊ या.



## खेळू या शब्दांशी

- **शब्द वाचा. शब्दांचा वापर करून वाक्य तयार करा.**

जसे– अमन वाचन कर.

| | | | |
|---|---|---|---|
| सई | डबा | आण | |
| अमन | वाचन | कर | . |
| विशाल | पाणी | दे | |
| आई | घर | बघ | |

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चौकटीत दिलेले शब्द वापरून वाक्ये तयार करण्यास सांगावीत. वाक्यांचे वाचन व लेखन करून घ्यावे. वाक्याच्या शेवटी पूर्णविराम देण्याचा सराव करून घ्यावा.

# ७. केवढा मोठा मुळा

- **ऐका. म्हणा व सराव करा.**



एकदा आजीने परसबागेत मुळा लावला. काही दिवसांनी मुळा मोठा झाला.



आजी मुळा उपटू लागली; पण मुळा बाहेर येईना. ती घामाघूम झाली. तिने आजोबांना हाक मारली. आजोबा मदतीला आले. आजीने धरले मुळ्याला. आजोबांनी धरले आजीला. दोघेही लागले मुळा उपटायला; पण मुळा उपटता येईना.

मग आजोबांनी त्यांच्या नातवाला बोलावले. आजीने धरले मुळ्याला. आजोबांनी धरले आजीला. नातवाने धरले आजोबांना. तिघेही लागले मुळा उपटायला; पण मुळा काही उपटला जाईना.



**नवीन शब्द शिकू या : परसबाग** – घरामागील छोटी बाग. **भुसभुशीत** – मोकळी



मग आजीने तिच्या नातीला मदतीसाठी बोलावले. आजीने धरले मुळ्याला. आजोबांनी धरले आजीला. नातवाने धरले आजोबांना. नातीने धरले नातवाला. चौघेही लागले मुळा उपटायला; पण मुळा काही उपटला जाईना.

इतक्यात कोपऱ्यात बसलेली मनीमाऊ म्याँव म्याँव करत आली. तिने मुळ्याभोवतीची माती भुसभुशीत केली.





आता पुन्हा आजीने धरले मुळ्याला. आजोबांनी धरले आजीला. नातवाने धरले आजोबांना. नातीने धरले नातवाला. चौघेही लागले मुळा उपटायला आणि काय आश्चर्य! एवढा मोठा मुळा सगळ्यांनी मिळून उपटला. एवढा मोठा मुळा पाहून त्यांना खूप नवल वाटले.



## आम्हांला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) आजीने परसबागेत काय लावले? ..........................................................

(आ) मदतीसाठी आजीने सर्वांत प्रथम कोणाला बोलावले? ..........................................................

(इ) मुळ्याभोवतीची माती कोणी भुसभुशीत केली? ..........................................................



## विचार करा व सांगा.

- **आजीच्या मदतीसाठी कोणकोण आले त्यांची नावे क्रमाने सांगा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कथेचे वाचन करून दाखवावे. कथेतील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. पाठातील प्रसंगाबाबत विद्यार्थ्यांना गटात चर्चा करण्याची संधी द्यावी. विद्यार्थ्यांना कथेतील घटनांचा क्रम सांगण्यास प्रेरित करावे. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना विविध गोष्टी ऐकवाव्यात.



## लिहिते होऊ या.

- पाठातील जोडाक्षरयुक्त शब्द लिहा व वाचा.

.............................. .............................. .............................. ..............................
.............................. .............................. .............................. ..............................
.............................. .............................. .............................. ..............................
.............................. .............................. .............................. ..............................



## खेळू या शब्दांशी

- दिलेल्या शब्दातील अक्षरे वापरून शब्द तयार करून लिहा.

**जसे–** नवसागर

वसा | साग | सार | सागर

सुधारक



## कृतीतून शिकू या.

- ठिपके जोडून मुळ्याचे चित्र तयार करा. चित्राचे नाव लिहा. त्यापासून तयार केल्या जाणाऱ्या पदार्थांची नावे लिहा.



..............................
..............................

**✲ पदार्थांची नावे**

........................................
........................................
........................................
........................................
........................................
........................................
........................................
........................................

# • प्रश्नचिन्ह (?)

• ऐका. म्हणा. समजून घ्या व सराव करा.







?







• प्रश्न तयार करा व लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| सौमित्र<br>सई<br>आत्या<br>समीर | कधी<br>कोठे<br>काय | आला<br>आली<br>राहते<br>करतो | ? |

जसे – सई कोठे राहते?

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील मजकुरावरून प्रश्नचिन्हाची ओळख करून द्यावी. प्रत्येक चित्रासाठी वापरल्या गेलेल्या प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांकडून घ्यावे. उत्तरे मिळण्यासाठी प्रश्नांची व प्रश्नचिन्हांची गरज स्पष्ट करून सांगावी. विद्यार्थ्यांकडून विविध प्रश्न तयार करून घ्यावे. प्रश्नचिन्ह लेखनाचा सराव घ्यावा.

# ८. आभाळ पडले.

- ऐका. म्हणा व सराव करा.



एका झाडाखाली ससा झोपला होता. अचानक झाडावरचे पान सशाच्या पाठीवर पडले. ससा घाबरून पळू लागला. बापरे! आभाळ पडलं धावा! धावा!

ससा पळत असताना वाटेत त्याला हरीण भेटले. हरणाने विचारलं, ''काय झालं? का पळतो आहेस?'' ससा म्हणाला, ''अरे, आभाळ पडलंय! तू ही पळ. तुझा जीव वाचव.''





ससा आणि हरीण धावत असताना त्यांना वाटेत हत्ती भेटला. हत्ती म्हणाला, ''अरे, तुम्ही का पळताय? काय झालं?'' हरीण म्हणाले, ''आभाळ पडलंय! तू पण पळ. आपला जीव वाचव.''

तिघे पळत असताना त्यांना वाटेत सिंह भेटला. सिंह म्हणाला, ''थांबा, थांबा, काय झालं? तुम्ही सगळे घाबरून असे कुठे पळताय.'' हत्ती सांगू लागला, ''आभाळ पडलं. धावा! धावा! तुम्हीपण तुमचा जीव वाचवा.''



## पुढे काय घडले असेल?

**नवीन शब्द शिकू या : धावा** – पळा. **वाटेत** – रस्त्यात.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्रकथेतील चित्रांचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रकथेचे वाचन करून दाखवावे. चित्रकथा प्रसंगानुरूप समजावून सांगावी. कथेतील संवादाचे सादरीकरण करून घ्यावे. कथेतील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. कथेतील घटनाक्रम ओळखण्यास सांगावे. कथेत पुढे काय घडले असेल ते विचारावे. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. कथा मराठीत सांगण्यास प्रेरित करावे.



## आम्हांला हे समजले.

- उत्तरे लिहा.

(अ) ससा कोठे झोपला होता? ..............................

(आ) सशाच्या पाठीवर काय पडले? ..............................

(इ) सशासोबत कोणकोण पळू लागले? ..............................



## विचार करा व सांगा.

- ससा घाबरून का पळत होता ते सांगा.



## लिहिते होऊ या.

- चित्र पाहा व नाव लिहा.

 ..................

 ..................

 ..................

 ..................




## खेळू या शब्दांशी

- अक्षरांची अदलाबदल करा. तयार होणारा शब्द वाचा व लिहा.

**जसे–** रस – सर

(अ) वार– .......... (आ) काम– .......... (इ) वात– .......... (ई) दीन– ..........



## कृतीतून शिकू या.

- कथेतील प्राण्यांचे मुखवटे तयार करा. मुखवटे लावून कथा गटात सादर करा.



## चला वाचू या.

ससा हा चपळ प्राणी आहे. त्याचे कान लांब असतात. सशाला चार पाय असतात. एक लहान शेपूट असते. सशाला गवत खायला आवडते. ससा बिळात राहतो.

- **चित्र पाहा. वाक्य लिहा.**



.........................................................................

.........................................................................



.........................................................................

.........................................................................



.........................................................................

.........................................................................

- **शब्द वाचा.**




- **उत्तरे सांगा.**

(अ) चौकटींतील 'ब' अक्षर असणारे शब्द शोधून सांगा.

(आ) चौकटींतील तीन अक्षरी शब्द शोधून सांगा.

(इ) चौकटीत आलेले जोडाक्षरयुक्त शब्द सांगा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील घटना, प्रसंग, अनुभवावर गप्पा माराव्यात. विद्यार्थ्यांकडून चित्राशी संबंधित वाक्ये तयार करून घ्यावीत. योग्य तेथे मार्गदर्शन करावे. मराठी भाषेत वाक्ये लिहून घ्यावीत. दिलेल्या शब्दांचे श्रुतलेखन करून घ्यावे.

- **चित्रे पाहा. चौकटीत लपलेली नावे शोधा. लिहा व गोल करा.**






| | | | | |
|---|---|---|---|---|
| वा | ब | मा | क | ड |
| घ | स | सा | च | सिं |
| घो | पो | प | ट | ह |
| डा | चि | म | णी | री |
| मो | का | व | ळा | ण |
| र | घा | र | ह | त्ती |






- **नावे लिहा.**

वाघ

- **तुम्हांला आवडलेल्या प्राण्याचे किंवा पक्ष्याचे चित्र काढा व नाव लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून चौकटीत दिलेली सर्व अक्षरे वाचून घ्यावीत. त्यात लपलेल्या प्राण्यांची व पक्ष्यांची नावे शोधण्यास सांगावी. शोधलेली नावे लिहिण्यास सांगावीत व वाचून घ्यावीत. प्राणी, पक्षी यांची चित्रे व शब्दकार्डे तयार करून घ्यावीत व नावे ओळखण्याचा सराव करून घ्यावा.

# ९. संगीत सभा

**ऐकू या. म्हणू या. गाऊ या.**



रंगीत पाखरांची
संगीत सभा
कर्कश कावळा
फांदीवर उभा...

मैनाचा स्वर
निघाला कडू
चिमणी लागली
तालात रडू...

कोकीळ काढतो
मंजूळ स्वर
कबूतराची
घुटर घुटरऽऽऽ

उडाली सभा
वाऱ्याच्या तालात
माकड गुपचूप
हासले गालात...!

– विष्णू रा. गिरी



**नवीन शब्द शिकू या :** **सभा** – बैठक. **मंजूळ** – गोड. **स्वर** – आवाज.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. कवितेचे साभिनय सादरीकरण करून घ्यावे. कवितेतील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. छोट्या कविता, बडबडगीतांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत. योग्य तेथे मार्गदर्शन करावे. कविता म्हणण्याचा सराव घ्यावा.



## आम्हांला हे समजले.

- **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) संगीत सभा कोणाची भरली होती? ..............................

(आ) कावळा कोठे उभा आहे? ..............................

(इ) चिमणी का रडू लागली? ..............................



## विचार करा व सांगा.

- **कवितेत आलेल्या पक्ष्यांची नावे सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **पक्षी व त्यांचे आवाज यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) कावळा | (१) मंजूळ |
| (आ) मैना | (२) कर्कश |
| (इ) कोकीळ | (३) कडू |



## खेळू या शब्दांशी

- **शब्द वाचा. वाक्य तयार करा.**

कुहूकुहू ..............................

चिवचिव ..............................

घुटरघुटर ..............................



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) आवडत्या पक्ष्याचे चित्र काढा व त्याबद्दल दोन वाक्ये सांगा.
(२) पक्षी/प्राणी विषय घेऊन गटात संवादांचे सादरीकरण करा.

# १०. स्वावलंबन

- ऐका. म्हणा व सराव करा.



**अमन :** बाबा, बाहेर किती ऊन आहे! आणि तुम्ही या उन्हात काय कचरा काढत बसलाय?

**बाबा :** अरे अमन, शांत हो. पाणी पी.

**अमन :** आपल्याकडे कचरा काढायला आणि झाडांना पाणी द्यायला रामूकाका येतात ना? ते काम आपलं नाही.

**बाबा :** अमन, काम कधीच छोटं किंवा मोठं नसतं. तू ज्या रामूकाकांबद्दल बोलत आहेस ना, ते जर दोन दिवस आले नाहीत तर आपल्या घराची काय अवस्था होईल?

**अमन :** आपलं घर घाण होईल. बागेतली झाडं सुकतील आणि सगळीकडे कचरा दिसेल.

**बाबा :** अमन, रामूकाकांचं काम आपल्यासाठी किती महत्त्वाचं आहे, पाहिलंस ना!

**अमन :** हो बाबा, आजपासून मीपण तुम्हांला प्रत्येक कामात मदत करणार!

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना संवादाचे वाचन करून दाखवावे. पाठातील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. विविध प्रकारांचे संवाद तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ऐकवावेत. संवादाचे सादरीकरण करून घ्यावे.



## मला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) बाबा कोणते काम करत होते? ..............................

(आ) अमनच्या घरी काम करायला कोण येत होते? ..............................



## विचार करा व सांगा.

- **तुमच्या घरी तुम्ही कोणकोणती कामे करता ते सांगा.**



## लिहिते होऊ या.

**प्र. १. अमनच्या बागेत कोणकोणती फळझाडे व फुलझाडे आहेत ते चित्राच्या आधारे लिहा.**

..............................

..............................

**प्र. २. तुमचे घर स्वच्छ राहण्यासाठी तुम्ही कोणती काळजी घ्याल ते लिहा.**

..............................

..............................



## खेळू या शब्दांशी

- **गोलातील शब्द घेऊन वाक्ये तयार करा.**

**जसे–** (स्वच्छ / सुंदर परिसर) स्वच्छ परिसर, सुंदर परिसर

(स्वच्छता / जिथे आरोग्य / तिथे) ..............................



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) नारळाच्या पानांपासून झाडू तयार करा.

(२) नारळाच्या करवंटीचा वापर करून आवडीची वस्तू तयार करा.

• चित्र पाहा व सांगा.

# • वनभोजन

## भाग–३



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना दिलेल्या चित्राचे बारकाईने निरीक्षण करण्यास सांगावे. दिलेल्या चित्राशी संबंधित अनुभव सांगण्यासाठी विद्यार्थ्यांना गटात संधी द्यावी. चित्रात कोण काय करत आहे. चित्रातील लोक एकमेकांशी काय बोलत असतील ते विचारावे. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. मराठी भाषेत चित्राबद्दल बोलण्यास प्रेरित करावे.

# ११. उंच उंच आकाश

ऐकू या. म्हणू या. गाऊ या.



उंच उंच आकाश
रंग त्याचा निळा
इतक्या उंच चढून
कुणी त्याला दिला?

हिरवी हिरवी झाडं
त्याला लाख लाख पानं
कोण घालतं पाणी
रोज त्यांना नेमानं?

दूर कोंबडा आरवतो
जागं करतो आम्हांला
पण कोण बाई उठवतं
झोपेमधून त्याला?

**– संजीवनी देवधर**

**नवीन शब्द शिकू या : नेमानं** – नियमितपणे. **आरवतो**– ओरडतो.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव करून घ्यावा. कुरकुर, भुरभुर यांसारख्या शब्दांचा अधिकाधिक सराव करून घ्यावा. कवितेतील शब्दांचा अर्थ समजावून सांगावा. छोट्या कविता, बडबडगीतांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून द्यावी. वाचन करून घेताना योग्य तेथे मार्गदर्शन करावे.



## मला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) आकाशाचा रंग कसा आहे ? ..........................................................................

(आ) आपल्याला झोपेतून कोण उठवतो ? ..........................................................................



## विचार करा व सांगा.

- **उंचच उंच असणाऱ्या निसर्गातील विविध घटकांची नावे सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **रिकाम्या जागी कंसातील शब्द ओळखून लिहा.**

(पानं, झोपेमधून, कुणी)

(अ) इतक्या उंच चढून .......................... त्याला दिला.

(आ) हिरवी हिरवी झाडं त्याला लाख लाख ..........................

(इ) पण कोण बाई उठवतं .......................... त्याला ?



## खेळू या शब्दांशी

- **दिलेल्या अक्षरापासून सुरू होणारे शब्द लिहा.**












## चला वाचू या.

| | |
|---|---|
| आपडी थापडी | तेल काढू |
| गुळाची पापडी | तेलंगीचे एकच पान |
| धम्मक लाडू | धर रे माझा कान |

- **चित्राचे निरीक्षण करा व सांगा.**



- **चित्रात दिसणाऱ्या विविध घटकांची नावे लिहा.**

**जसे–** पक्षी

| | | |
|---|---|---|
| पक्षी | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |
| ........................ | ........................ | ........................ |



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** चित्रात आलेल्या घटकांची चित्रशब्दकार्डे तयार करा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रात दिसणाऱ्या विविध घटकांची नावे विचारावीत. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठीचे मराठी शब्द सांगावेत. ते शब्द लिहून व वाचून घ्यावेत. लिहिलेल्या नावांची वाक्ये तयार करून घ्यावीत.

# १२. संत एकनाथ

- **ऐका. म्हणा व सराव करा.**



उन्हाळ्याचे दिवस होते. दुपारची वेळ होती. कडक ऊन पडले होते. आजूबाजूला रखरखीत वाळवंट पसरलेले होते. अशा त्या वाळवंटात एक गाढव तडफडत होते. संत एकनाथ महाराजांनी ते पाहिले. गाढव तहानेने व्याकूळ झालेले होते, पण त्या वाळवंटात गाढवाला पाणी कोठून मिळणार? महाराजांना त्याची दया आली. गाढवाची तडफड त्यांना पाहवेना. ते लगेच त्याच्याजवळ गेले. त्यांच्या खांद्यावर कावड होती. त्यांनी कावड खाली ठेवली. त्यातील पाणी त्या मुक्या प्राण्याला मोठ्या मायेने पाजले!

- **उत्तरे सांगा.**

  (अ) तहानेने कोण व्याकूळ झाले होते?

  (आ) गाढवाला कोणी पाणी पाजले?

**नवीन शब्द शिकू या : रखरखीत** – कोरडे. **व्याकूळ** – अस्वस्थ. **कावड** – पाणी वाहून नेण्याचे साधन.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठाचे वाचन करून दाखवावे. पाठातील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संतांच्या विविध कथा व प्रसंग ऐकवावेत. संतांची चित्रे दाखवून त्यांची ओळख करून द्यावी.

# १३. भाज्यांचे भांडण, आजीचे जेवण

• ऐका. म्हणा व सराव करा.

एक होती  . एके दिवशी  घेऊन ती बाजारात गेली. बाजारातून तिने  आणल्या आणि स्वयंपाकघरात एका  भरून ठेवल्या. आजी बाहेर जाताच टोपलीतून एक  बाहेर पडले. ते म्हणाले, ''मी आहे तुमचा राजा, तुम्ही माझं ऐकायचं.''  चिडून म्हणाले, ''नाहीच मुळी. मी आहे लालेलाल, मीच आहे राजा!''  म्हणाला, ''माझं ऐका, सर्व भाज्या चवदार करणारा मीच आहे राजा.''  आणि  भांडण सोडवण्यासाठी धडपड करू लागले; पण कोणीच ऐकेना. तेवढ्यात  परत आली. तिने  कापला, टोमॅटो चिरले.  निवडली, धुतली.  भाजून भरीत केले.  चिरून कोशिंबीर केली. भाज्यांनाही गंमत वाटली.

• चित्र बघा. ऐका व म्हणा.


वांगे


काकडी


कांदा


गाजर


टोमॅटो

**शिक्षकांसाठी :** शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्राच्या जागी योग्य शब्द घालून गोष्ट ऐकवावी. अपरिचित मराठी शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. गोष्टीतील चित्रांसाठी मराठी शब्द सांगण्यास प्रेरित करावे. गोष्टीचे सादरीकरण करून घ्यावे.

# १४. नदीताई

**ऐकू या. म्हणू या. गाऊ या.**

नदीताई, नदीताई
कुठे चाललीस ?
निळ्या निळ्या समुद्रात,
शिंपल्यांच्या रानात,
धावते मी बाई.

नदीताई, नदीताई काय करतेस ?
सगळ्यांना मी देते पाणी,
मंजूळ मी गाते गाणी
माझे काम हेच बाई.

नदीताई, नदीताई
कुठून येतेस ?
उंच उंच पर्वतांतून
खोल दऱ्या धावून
ओलांडून वनराई
येते मी बाई.

– मिलिंदकुमार जोशी



**नवीन शब्द शिकू या : समुद्र** – सागर. **मंजूळ**– गोड. **वनराई** – खूप झाडे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय म्हणून घ्यावी. यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव घ्यावा. कवितेतील अपरिचित शब्दांचा अर्थ समजावून सांगावा. छोट्या कवितांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून द्यावीत. कविता म्हणण्याचा सराव करून घ्यावा.



## मला हे समजले.

- उत्तरे लिहा.

(अ) नदीताई कोठे चालली आहे? ............................................................

(आ) मंजूळ गाणे कोण गाते? ............................................................

(इ) नदीताई सर्वांना काय देते? ............................................................



## विचार करा व सांगा.

- नदीचे पाणी आपल्याला कशाकशासाठी उपयोगी पडते?



## लिहिते होऊ या.

- कवितेतील जोडाक्षरयुक्त शब्द शोधून लिहा.

| | | |
|---|---|---|
| .......................... | .......................... | .......................... |
| .......................... | .......................... | .......................... |
| .......................... | .......................... | .......................... |
| .......................... | .......................... | .......................... |




## खेळू या शब्दांशी

- चित्र व शब्द जोडून नवीन शब्द तयार करा व लिहा.

(१)  पूर – ....................

(२)  फूल ....................

(३)  गाव – ....................

(४)  पाखरू ....................



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** नदीचे चित्र काढा. नदीच्या पाण्यात विविध प्राण्यांची चित्रे काढा. त्यांची नावे लिहा.

# १५. छुमछुम

- ऐका. म्हणा व सराव करा.

शुकशुक! आवाज करून खुशी अंगणात दाणे टिपणाऱ्या कोंबड्यांची गंमत करायची.





शुकशुक! आवाज करून कामात रमलेल्या आईची पण गंमत करायची.

भॉ! आवाज करून खेळणाऱ्या धाकट्या भावाचीही गंमत करायची.



धप्प! आवाज करून सदूकाकांना घाबरवायची.



**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठाचे वाचन करून दाखवावे. त्या विषयावर गटामध्ये चर्चा घडवून आणावी. पाठातील चित्रांचे निरीक्षण करून घटनाक्रम सांगण्यास सांगावा. स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठीचे मराठी शब्द सांगावेत. पाठातील प्रसंग मराठी भाषेत सांगण्यास प्रेरित करावे.



एकदा खुशीच्या आजीने तिला छोटासा आकर्षक बटवा भेट दिला.



खुशीने तो चटकन उघडला. त्यात गुलाबी कागदाची पुडी होती. त्यात चांदीच्या पैंजणांची सुरेख जोडी होती. तिने पैंजण पायांत घातले. त्यांचा छुमछुम आवाज तिला फारच आवडला. ती घरभर नाचायला, धावायला लागली. खुशी जाईल तिकडे छुमछुम! छुमछुम! असा आवाज येऊ लागला.





आता खुशीने 'शुकशुक!' करण्याआधीच कोंबड्या पळून जाऊ लागल्या. तिने 'शुक' करण्याआधीच आई मागे वळून पाहू लागली.

तिने 'भॉ' करण्याआधीच तिचा भाऊ बाहेर पळू लागला आणि तिने 'धप्प' करण्याआधीच सदूकाकांचे तिच्याकडे लक्ष जाऊ लागले. आता खुशीला कोणाचीच गंमत करता येईना. तिच्या पैंजणाच्या छुमछुम आवाजाने सगळे आधीच सावध होऊ लागले.



पैंजण



बटवा



कोंबडी



## आम्हांला हे समजले.

- उत्तरे लिहा.

(अ) खुशी कोणाकोणाची गंमत करायची ? ..............................................................

..............................................................

(आ) आजीने खुशीला कोणती भेट दिली ? ..............................................................

..............................................................

(इ) खुशी घरभर का नाचू लागली ? ..............................................................

..............................................................



## विचार करा व सांगा.

- खुशीच्या पैंजणामुळे काय झाले ?



## लिहिते होऊ या.

**प्र. १. गोलातील शब्द वाचा. गोलाबाहेरील चित्रांशी जोडा.**




**प्र. २. वाक्ये वाचा. योग्य ठिकाणी पूर्णविराम (.) व प्रश्नचिन्ह (?) देऊन वाक्ये पुन्हा लिहा.**

(अ) आजी घरी आली ..............................................................

..............................................................

(आ) किती वाजले आहेत ..............................................................

..............................................................

(इ) मी शाळेत जातो ..............................................................

..............................................................

विनामूल्य वितरणासाठी




## खेळू या शब्दांशी

- शब्द तयार करा. रिकाम्या जागी लिहा व वाचा.

जसे–

|  | ब |  |
|---|---|---|
| चु | ट | की |
|  | वा |  |

बटवा

चुटकी

|  | पैं |  |
|---|---|---|
| का | ज | ळ |
|  | ण |  |

|  | वा |  |
|---|---|---|
| फु | टा | णा |
|  | णा |  |

|  | आ |  |
|---|---|---|
| आ | का | श |
|  | र |  |



## चला वाचू या.

- दिलेली पूर्णविराम व प्रश्नार्थक वाक्ये वाचा.

✻ आजीने खुशीला बटवा दिला.
✻ खुशीने बटवा चटकन उघडला.
✻ बटव्यात छान पैंजण होते.
✻ खुशीने पायात पैंजण घातले.

✻ आजीने खुशीला काय दिले ?
✻ खुशी कोणाची गंमत करायची ?
✻ कोंबड्या का पळू लागल्या ?
✻ पैंजणाचा आवाज कसा आहे ?



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** (१) रंगीत कागदांचे विविध आकार कापून त्यांवर नादमय शब्द लिहा.
(२) शिक्षकांच्या मदतीने रंगीत कागदांपासून आकर्षक बटवा तयार करा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध वस्तू व त्यांचे आवाज प्रत्यक्ष ऐकवावेत. त्या आवाजासाठी असणारे मराठी शब्द सांगावेत. ते शब्द म्हणून घ्यावेत. चित्र व आवाजदर्शक शब्दांच्या जोड्या लावून घ्याव्यात. पूर्णविरामांचा व प्रश्नचिन्हांचा सराव विविध प्रकारांच्या कृतींतून करून घ्यावा. वाक्यात व उताऱ्यात योग्य ठिकाणी पूर्णविराम व प्रश्नचिन्ह देण्यासाठी मार्गदर्शन करावे. अशा विविध कृतींतून प्रश्नचिन्ह व पूर्णविराम यांचा सराव करून घ्यावा. पूर्णविरामयुक्त व प्रश्नचिन्हयुक्त वाक्ये कशी वाचली जातात हे दाखवावे व याचा अधिक सराव करून घ्यावा.

## चला, सँडविच तयार करू या.

- ऐका. म्हणा व सराव करा.

**साहित्य–**


ब्रेड


बटर


पुदिना चटणी
टोमॅटो सॉस


उकडलेले बटाटे


काकडीचे काप


टोमॅटोचे काप


किसलेले चीज


मीठ


साखर













**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. सँडविच तयार करण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांची नावे सांगावीत व कृती करून घ्यावी. केलेल्या कृतीचा घटनाक्रम लावून घ्यावा व कृती मराठी भाषेत सांगण्यास प्रेरित करावे.

# ● स्नेहसंमेलन

● चित्र पाहा. सांगा.




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे. चित्रातील वस्तू, व्यक्ती यांची ओळख करून द्यावी. चित्रातील व्यक्ती काय बोलत असतील ? काय करत आहे याबद्दल चर्चा करावी. त्यांची स्वभाषा स्वीकारावी. त्यासाठी असलेले मराठी शब्द सांगावेत. चित्राविषयी मराठीत बोलण्यास प्रेरित करावे.

# १६. फुलपाखरू

ऐकू या. म्हणू या. गाऊ या.

फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
हळूच टिपते
फुलांचे रंग

फुलावर बसते
खुदकन हसते
फुलांचे रंग
पंखांना फासते

निळसर जांभळे
ठिपके छान
सोनेरी रंगाची
सुंदर कमान

फुलांच्या दुनियेत
फुलपाखरू दंग
पंखांना त्याच्या
फुलांचे रंग

– दादासाहेब कोते



**नवीन शब्द शिकू या : दुनिया** – जग. **फासणे** – लावणे. **दंग** – गुंग.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. कवितेतील आशयाचा अर्थ समजावून सांगावा. कविता म्हणण्याचा सराव करून घ्यावा.



## मला हे समजले.

**प्र. १. कसे ते लिहा.**

(अ) फुलपाखरू रंग टिपते ......................     (आ) फुलपाखरू हसते ......................

**प्र. २. कोठे ते लिहा.**

(अ) फुलपाखरू दंग होते ......................     (आ) फुलपाखरू बसते ......................



## विचार करा व सांगा.

- तुम्हांला फुलपाखरू का आवडते ते सांगा.



## लिहिते होऊ या.

- दिलेल्या रंगाच्या वस्तूचे नाव लिहा.

लाल ....................     हिरवा ....................     निळा ....................

पिवळा ....................     पांढरा ....................     काळा ....................



## खेळू या शब्दांशी

- मध्यभागी चौकटीत दिलेली अक्षरे घेऊन चित्रांची नावे लिहून कोडे पूर्ण करा.






## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** फुलपाखराचे चित्र वहीत काढा. फुलपाखराबद्दल दोन वाक्ये लिहा.

..........................................................     ..........................................................

# १७. मदतीचा हात

- ऐका. म्हणा व सराव करा.



एके दिवशी अंजली शाळेत जात असताना तिला झाडाखाली बसलेले मोरूकाका दिसले. ते गावात सफाईचे काम करत असत. काका दमून बसले होते. त्यांच्या बाजूला एक हंडा पडला होता. त्यात पाणी नव्हते. अंजलीने विचारले, ''काका, काय झालं? तुम्ही एवढे थकलेले दिसताय.''

काका हळू आवाजात म्हणाले, ''घरातून पाणी भरून आणलं होतं; पण वाटेत अडखळून पडलो. हंड्यातील सगळे पाणी सांडले. आता खूप ऊन असल्याने तहान लागली आहे. थोडं पाणी मिळालं, तर बरं होईल.''



अंजलीने तिच्या पाण्याच्या बाटलीतील पाणी काकांना दिले. काका म्हणाले, ''बाळ तू स्वत:जवळचं पाणी दिलंस? शाळेत काय पिणार?''

अंजली हसून म्हणाली, ''काका, मला शाळेत पाणी मिळेल. आता तुम्हांला गरज आहे म्हणून हे पाणी तुम्ही घ्या.'' काका पाणी प्यायले. काकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. ते आनंदाने हसले.

**नवीन शब्द शिकू या : हंडा–** पाण्याचे भांडे. **अडखळणे–** चालताना तोल जाणे.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना पाठाचे प्रकट वाचन करण्यास सांगावे. पाठातील अपरिचित शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. पाठातील चित्रांसाठी विद्यार्थ्यांना मराठी शब्द सांगण्यास प्रेरित करावे. पाठातील कथेचा विद्यार्थ्यांना समजलेला आशय मराठी भाषेत सांगण्यास प्रोत्साहित करावे. कथेचे सादरीकरण करून घ्यावे.



## मला हे समजले.

- **योग्य पर्याय निवडून गोल ◯ करा.**

(अ) अंजली शाळेत / फिरायला चालली होती.

(आ) मोरूकाका झाडाखाली / घरात बसले होते.

(इ) मोरूकाका सफाईचे / घर बांधण्याचे काम करत होते.



## विचार करा व सांगा.

- **तुमच्या शाळेत काम करणाऱ्या शिपाईकाकांना तुम्ही कोणती मदत कराल?**



## लिहिते होऊ या.

- **उतारा वाचा. योग्य ठिकाणी पूर्णविराम (.) व प्रश्नचिन्ह (?) द्या.**

आज विनयचा वाढदिवस होता त्याच्या बाबांनी त्याला एक सायकल भेट दिली सायकल पाहून विनय खूश झाला बाबांनी विचारले, ''विनय सायकल आवडली का'' विनय म्हणाला, ''हो बाबा, सायकल खूपच छान आहे मी मित्रांना दाखवून येऊ का''



## खेळू या शब्दांशी

- **ऐका व म्हणा.**

* कच्चा पापड, पक्का पापड
* चटईला टाचणी टोचली.

* कच्ची पपई, पक्की पपई
* तांबडा भोपळा, हिरवा भोपळा



## चला वाचू या.

रोज सकाळी लवकर उठावे. वेळेवर काम करावे.
नेहमी खरे बोलावे. इतरांना मदत करावी.

# १८. चतुर शेतकरी



- ऐका. म्हणा व सराव करा.



एक शेतकरी शेतात काम करत होता. अचानक तिथे अस्वल आले. अस्वल शेतकऱ्याला मारायला धावले. शेतकरी म्हणाला, ''मला मारू नको, शेतात पीक आलं, की मी तुझ्या आवडीचं पीक तुला खाऊ घालेन.''



अस्वल म्हणाले, ''जमिनीच्या वरचं पीक माझं आणि खालचं पीक तुझं राहिल.'' शेतकऱ्याने बटाटे लावले. जेव्हा पीक आले, तेव्हा अस्वलाला फक्त पाने मिळाली. अस्वल चिडून निघून गेले.

पुढच्या वेळी अस्वल म्हणाले, ‘‘बघ, या वेळी जमिनीच्या खालचं पीक माझं आणि वरचं तुझं.’’ शेतकऱ्याने या वेळी गहू पेरले. जेव्हा पीक तयार झाले, शेतकऱ्याला छान गहू मिळाले आणि अस्वलाला फक्त मुळे. अस्वल पुन्हा रागावले.





या वेळी अस्वलाने शेतकऱ्याला अद्‌दल घडवण्याचे ठरवले. तो शेतकऱ्याला म्हणाला, ‘‘जमिनीच्या सर्वांत वरचे आणि सर्वांत खालचे पीक माझे.’’ शेतकरी तयार झाला. शेतकऱ्याने या वेळी शेतात ऊस लावला. जेव्हा पीक आले, तेव्हा अस्वलाला फक्त ऊसाची पाने आणि मुळे मिळाली. शेतकऱ्याने ऊस घेतला. शेवटी अस्वल निराश होऊन निघून गेले.



**शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ**



**नवीन शब्द शिकू या : अद्‌दल घडवणे –** धडा शिकवणे. **निराश होणे –** नाराज होणे.

**शिक्षकांसाठी :** पाठाचे प्रकट वाचन करून घ्यावे. विद्यार्थ्यांना दिलेल्या पाठातील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे. पाठातील अपरिचित शब्दांचा अर्थ समजावून सांगावा. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विविध गोष्टी ऐकवाव्यात व कथेचे सादरीकरण करून घ्यावे. कथेतील घटना व प्रसंगाविषयी गटात चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. समजून घेतलेली गोष्ट सांगण्यास प्रेरित करावे. योग्य तेथे मार्गदर्शन करावे.



## आम्हांला हे समजले.

- **उत्तरे लिहा.**

(अ) शेतकरी काम करत असताना अचानक तेथे कोण आले?

..........................................................

..........................................................

(आ) शेतकऱ्याने सर्वांत प्रथम कोणते पीक लावले?

..........................................................

..........................................................



## विचार करा व सांगा.

- **अस्वल तुम्हांला भेटले, तर तुम्ही काय कराल?**



## लिहिते होऊ या.

- **शब्द पाहा व लिहा.**

| पीक | जमीन | बटाटा | शेतकरी | अस्वल |
|---|---|---|---|---|
| ........ | ........ | ........ | ........ | ........ |
| ........ | ........ | ........ | ........ | ........ |



## खेळू या शब्दांशी

- **शब्दडोंगर तयार करा.**

**जसे–**

घर

हे घर

हे माझे घर

हे माझे घर आहे.

बाग

............

............

............

............

............

............



## चला वाचू या.

एका गावात एक शेतकरी राहत होता. एके दिवशी त्याची गाय चोरीला गेली. शेतकरी न्याय मागण्यासाठी गावच्या पाटलाकडे गेला. पाटलाने हुशारीने चोराला पकडले. शेतकऱ्याला त्याची गाय परत मिळाली.

# ओळखा पाहू.

- वाचा. ओळखा. सांगा व लिहा.









डाळिंबाचे दाणे
आवडीने खातो
पेरूच्या फोडीसाठी
कोण अडून राहतो ?
............................
............................



लांब मान
पसरट पाय
ओझे वाहतो
नाव काय ?
............................
............................



माहितीचा खजिना
उघडून देतो
कोण हा मित्र
जगाशी जोडतो ?
............................
............................



# १९. आगगाडी

ऐकू या. म्हणू या. गाऊ या.



झुकझुक गाडी
घरांची माळ,
चालती फिरती
अजब चाळ.

धावत जाते
गावोगाव,
हुंदडत फिरते
गावन्‌गाव.

पाऊस, वाऱ्याची
नसे भीती,
वाटेत वादळ
असो किती.

तिला न अडवी
नदी, पहाड,
टाटा म्हणते
झाडन्‌झाड.

छंद म्हणा की
उद्योग खरा,
सर्वांना पोचवी
घरा घरा.

– शंकर विटणकर

**नवीन शब्द शिकू या : हुंदडणे** – बागडणे, नाचणे. **वादळ** – सोसाट्याचा वारा.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना कविता ऐकवावी. विद्यार्थ्यांकडून कविता तालासुरात व साभिनय सादर करून घ्यावी. कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांचा सराव करून घ्यावा. शब्दांचे अर्थ समजावून सांगावेत. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कविता ऐकवावी. कविता म्हणण्याचा अधिक सराव करून घ्यावा.



## मला हे समजले.

**प्र. १. कवितेत आलेल्या यमक शब्दांच्या जोड्या लिहा.**

...................... ...................... ...................... ......................

...................... ...................... ...................... ......................

**प्र. २. कवितेतील ओळी पूर्ण करा.**

झुकझुक गाडी
घरांची माळ
....................................
....................................
................................................
................................................ .



## विचार करा व सांगा.

- **तुम्ही कधी आगगाडीत बसला आहात का? तुम्हांला आलेला एखादा अनुभव सांगा.**



## लिहिते होऊ या.

- **दिलेल्या चित्रांशी संबंधित शब्द लिहा व त्या शब्दांपासून वाक्ये तयार करा.**




...................... ......................
...................... ......................



...................... ......................
...................... ......................



## कृतीतून शिकू या.

- **उपक्रम :** रिकाम्या काडेपेटीचा वापर करून आगगाडी तयार करा व त्यावर आगगाडीसंबंधी शब्द लिहा.

• **चित्र पाहा. चित्राविषयी दोन ते तीन ओळी लिहा.**



............................................................................................................................................

............................................................................................................................................

............................................................................................................................................

............................................................................................................................................

............................................................................................................................................

............................................................................................................................................



## चला वाचू या.

रूपा भाजी आणायला निघाली. आईने तिला पिशवी दिली. रूपाने भाजी घेतली. रूपा घरी आली. आईने विचारले, ''गाजर आणलेस का?'' ''अगं, मी विसरलेच.'' रूपा म्हणाली. तिने पिशवीतून भाज्या काढल्या, पण तिला पिशवीत लाललाल गाजरही दिसले. ''हे गाजर पिशवीत कसे आले? मी तर गाजर घेतलेच नव्हते. ही जादूची पिशवी आहे की काय!'' असे रूपा म्हणाली.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून चित्राचे निरीक्षण करून घ्यावे. चित्राविषयी गप्पा माराव्यात. चित्रातील घटनेविषयी चर्चा करावी. चित्राविषयी दोन ते तीन ओळी विद्यार्थ्यांकडून लिहून घ्याव्यात. तसेच दिलेला परिच्छेद वाचून घ्यावा.

प्रिय विद्यार्थी मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

जर तुम्हांला कोणी अयोग्य रीतीने स्पर्श केल्यामुळे तुम्ही अस्वस्थ झाला असाल, तर तुम्ही अजिबात गप्प बसू नका. अशी घटना घडल्यास, तुम्ही खालील गोष्टी करणे आवश्यक आहे.

१) स्वतःला दोष देऊ नका.

२) तुमचा ज्यांच्यावर विश्वास आहे, त्यांना घडलेल्या घटनेबद्दल सांगा.

३) तुम्ही पोक्सो ई-बॉक्सद्वारे तुमच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्थापन केलेल्या राष्ट्रीय आयोगाला देखील कळवू शकता.

**जेव्हा तुम्हांला कोणी अयोग्यरीत्या स्पर्श करतो, तेव्हा तुम्हांला वाईट वाटू शकते, तुम्ही गोंधळून जाऊ शकता, तुम्हांला असहाय्य वाटू शकते; पण तुम्हांला 'वाईट' वाटण्याचे काहीच कारण नाही, कारण यात तुमचा दोषच नाही.**




**हे बटण दाबा.**

**POCSO हा e-box ncpcr@gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**जर तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असेल. तुम्हांला कोणी त्रास दिला असेल आणि तुम्ही गोंधळलेले असाल, पीडित असाल, तणावात असाल अथवा अशा प्रकारचा त्रास सहन करणारे कोणी मूल तुमच्या माहितीत असेल, तर १०९८ (दहा नऊ आठ) ला संपर्क साधा. त्यामुळे आपले व मित्रांचे जीवन बदलू शकते.**

CHILD LINE 1098 NIGHT & DAY

**चाइल्ड लाइन १०९८ (दहा नऊ आठ) : ही एक २४ तास टोल फ्री राष्ट्रीय आपत्कालीन फोन सेवा आहे. महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे, पीडित मुलांसाठी राबवला जाणारा, चाइल्ड लाइन फाउंडेशनने सुरू केलेला हा उपक्रम आहे.**

नए समाज की ओर
Towards a new dawn

- **विद्यार्थ्यांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श ओळखण्यासाठी त्यांच्या वयोगटांनुसार शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या मार्गदर्शन करावे.**












**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

करू मैत्री मराठीशी इयत्ता चौथी
(हिंदी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, तेलुगु,
तमिळ, बंगाली माध्यमांच्या शाळांकरिता)

समग्र शिक्षा
Samagra Shiksha

( विनामूल्य वितरणासाठी )